# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

क्र.नि.वि./आयसीडी/२०२२-२३/२२१.

**परिपत्रक**

मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नित, स्वायत्त, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक आणि विद्यापीठाच्या उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजतिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १३१(१) अन्वये विद्यापीठाच्या अधिसभेवरील पदवीधर मतदार संघातून दहा (१०) नोंदणीकृत पदवीधरांची नव्याने निवड करण्यासाठी नविन मतदार यादी तयार करण्याकरीता जाहीर प्रकटन लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, ज्या पदवीधर मतदारांना मतदार नोंदणी करताना संगणक व इंटरनेट सेवा इत्यादींची उपलब्धता होत नसेल अशा इच्छुक मतदार नोंदणीकरीता अर्ज करणाऱ्या मतदारास आपल्या महाविद्यालया मार्फत/विद्यापीठाच्या उपकेंद्रा मार्फत संगणक व इंटरनेट सेवा कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करून देण्यात यावी. जेणेकरून मतदारास मतदार यादीत आपले नाव नोंदविणे सोईचे होईल.

सर्व संबंधीतांनी याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२२
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.

(प्रा. शैलेंद्र देवळाणकर)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रत :-** मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित, स्वायत्त, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक आणि विद्यापीठाच्या उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना योग्य ती कार्यवाही करीता.